# टीम अण्णाचा पर्दाफाश करणार

नवी दिल्ली, दि. १५–अण्णा हजारे यांनी टीममधील सदस्यांचा वर्तणुकीबाबत नाराजीने लिहिलेली अप्रकाशित पत्रे जाहीर करून टीम अण्णातील सदस्यांचा पर्दाफाश करणार असल्याची धमकी हजारे यांचे आधीचे ब्लॉगर राजू परुळेकर यांनी मंगळवारी दिली. केजरीवाल व इतर सदस्यांनी अण्णांना जनतेशी थेट संवाद साधू दिला नाही, असा आरोपही परुळेकर यांनी केला.

परुळेकर ब्लॉगकर म्हणाले की, ब्लॉगकर प्रकाशित करण्यासाठी अण्णांनी अनेक पत्रे दिली होती. त्यातील बरीच पत्रे प्रकाशित झाली नाहीत. अरविंद केजरीवाल आणि इतर सदस्यांनी ती पत्रे प्रकाशित होऊ दिली नाहीत. या पत्रात अण्णांनी टीम अण्णातील सदस्यांच्या वर्तणुकीबाबत नाराजी व्यक्त केली होती. ती पत्रे अजूनही आपल्याकडे असून ती लवकरच दिल्लीतील एका पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात येतील.



## परुळेकर यांची धमकी

देशभरातील लोक आपल्या संपर्कात असल्याचा दावा करून केजरीवाल आणि कंपूने टीम अण्णाच्या राष्ट्रव्यापी आंदोलनाचा फायदा घेतला. केजरीवाल आणि कंपूच्या चारित्र्याचा दुसरा पैलू आपण लवकरच जाहीर करणार आहोत.